MHRG160001332015 नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०१५

अनिता मढवी व इतर वि.
गणपत गायकवाड व इतर

निशाणी क्र.६९ वरील आदेश

वादी क्र.४ याने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन दि.०६/०५/१९७७ रोजीच्या खरेदीखताच्या दस्ताला पुराव्यातील निशाणी देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. वादी क्र.४ याने असे कथन केले आहे की, दाव्यामध्ये नमुद केलेले दिनांक ०६/०५/१९७७ रोजीचे खरेदीखताचे दस्त हे पुराव्याकामी दाखल केलेले आहे. सदरचे दस्त हे ३० वर्षापुर्वीपेक्षा जूने दस्त असून भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे त्यास निशाणी देणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे. तसेच, सदरचे दस्त पुराव्यात वाचण्यात आले असून त्यास अर्टीकल ए असे देण्यात आलेले आहे. सबब, वादीने सदरच्या खरेदीखताच्या दस्ताला पुराव्यात देण्यात आलेले 'अर्टीकल ए' हे रद्द करण्यात येवून सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींतर्फे सन्माननीय विधिज्ञांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीचे पुराव्यात दस्ताबाबत योग्य तो खुलासा नाही.

४. दोन्ही सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अर्ज, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा ठरावाकरीता, मेंडेटरी हुकूम व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा हा अंशतः पुराव्याकामी नेमलेला आहे. वादी क्र.४ यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.५६ कडे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांच्या पुराव्यामध्ये सदर दस्तास **अर्टीकल ए** असे देण्यात आले आहे. त्यानंतर, वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सदर दस्तास पुराव्यामधील निशाणी देण्यात यावी असे कथन केले आहे. सदर दस्ताचे

अवलोकन केले असता, सदरचा खरेदीखताचा दस्त हा गणपत काशिनाथ गायकवाड यांनी वादीचे वडील कृष्णा अप्पा मढवी यांचे लाभांत दिनांक ०६/०५/१९७७ रोजी दुय्यम निबंधक रोहा येथील कार्यालयात नोंदणीकृत करुन दिलेला आहे. तसेच, प्रस्तुत खरेदीखताचे दस्त हे जूने असून ३० वर्षांपुर्वीचा असल्याचे दिसून येते. त्यामुळे, भारतीय पुरावा कायदा कलम ९० अन्वये या दस्तास अटी शर्ती लागु होत असल्याचे दिसत आहे.

५. भारतीय पुरावा कायद्यामधील तरतुदींचा विचार करता, सदरचा दस्त योग्य व्यक्तीच्या ताब्यातुन दाखल केला असल्यास त्या दस्तावरील सहया व इतर भाग हा एका ठराविक व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचा व ठराविक व्यक्तीने करुन दिल्याचा व साक्षांकित केल्याचे गृहीतके प्राप्त असल्याचे निदर्शनास येते. अशा परिस्थितीत ,सदरचा दस्त दि.०७/११/२०१५ रोजी न्यायालयात दाखल केल्याचे निदर्शनास येते. अशा परिस्थितीत सदरचा दस्त ३० वर्षापेक्षा अधिक काळाचे असल्याचे निदर्शनास येते. सदरचा दस्त पुराव्यात दाखल करुन वाचण्यात आल्यामुळे त्यामधील मजकुर सिध्द होत नाहीत. या बाबींचा विचार करता, खालील आदेश पारित करण्यात येते :–

## आदेश

**०१** अर्ज (नि.क्र.६९) मंजूर करण्यात येते.

**०२** वादी यांनी पुराव्यात दाखल केलेल्या दि.०६/०५/१९७७ रोजीच्या खरेदीखताच्या दस्ताला निशाणी देवून पुराव्यात वाचण्यात येते.

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

SHIVRATRI RAJU ASHOK
Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2024.07.19 17:39:20 +0530

दिनांक–१९.०७.२०२४ **(रा.अ.शिवरात्री)**
पाली दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाली